**<u>ठळक बातम्या</u>**

- ट्रंप प्रशासनाने लावलेल्या आयातशुल्काविषयी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्याची केंद्रसरकारकडून दखल; परिणामांचा बारकाईने अभ्यास करण्यात येणार

- येत्या पाच वर्षांत भारत आणि ब्राझीलमधला द्विपक्षीय व्यापार २० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पलीकडे नेण्याचा प्रधानमंत्र्यांचा विश्वास

- मानहानीच्या खटल्या प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी भिवंडी दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा नवे जामीन म्हणून अर्ज

**आणि**

- ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी ट्वेंटी क्रिकेट मालिका भारताने २-१ नं जिंकली

**<><><><><>**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं ट्रम्प यांनी जगभरातल्या देशांवर लादलेलं शुल्क असंवैधानिक असल्याचा निर्णय दिल्यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक पातळीवर १० टक्के आयात शुल्क लागू करण्याचा आदेश जारी केला आहे. या आदेशावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली असून, तो तातडीनं लागू होणार आहे. भारतासह जगभरातल्या इतर देशांसाठीही हा आदेश लागू असेल. या आदेशामुळे भारतावरचं आयात शुल्क तात्पुरत्या स्वरूपात १० टक्क्यांपर्यंत खाली येईल असा खुलासाही ट्रम्प यांच्या प्रशासनानं केला आहे.

**<><><><><>**

ट्रंप प्रशासनाने लावलेल्या आयातशुल्काविषयी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्याची दखल केंद्रसरकारने घेतली असून त्याच्या परिणामांबाबत बारकाईने अभ्यास करण्यात येत आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलंय की ट्रंप यांनी या निवाड्याबाबत पत्रकारपरिषद घेऊन काही घोषणा केल्या आहेत, त्याही विचारात घेतल्या आहेत.

<><><><><>

अमेरिकेतल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याची वाट न पाहता घाईने व्यापार करार का केला,  असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलंय की न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता भारताने अमेरिकेला जास्त व्यापार सवलती दिल्या आहेत. आता या कराराचा पुनर्विचार करावा आणि कोणत्याही दबावाविना उचित करार करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><><>

भारत आणि अमेरिकेमधल्या नव्या व्यापार कराराविरोधात काँग्रेस राज्यभरात आंदोलन करणार असल्याची माहिती काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. ते बातमीदारांशी बोलत होते. या करारामुळे देशभरातल्या शेतकऱ्यांसह, महाराष्ट्रातल्या मका, सोयाबीन, कापूस, तूरडाळ आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचं नुकसान फटका बसणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

येत्या पाच वर्षांत भारत आणि ब्राझीलमधला द्विपक्षीय व्यापार २० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पलीकडे नेण्याचा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासिओ लुला

दा सिल्वा यांच्यात आज नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी संयुक्त निवेदन दिलं, त्यावेळी ते बोलत होते. ब्राझील हा लॅटिन अमेरिका प्रदेशातला भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - Modi Brazil Trade (१७ सेकंद)**

भारत आणि ब्राझीलच्या एकत्र काम करण्यानं ग्लोबल साउथ अंतर्गत येत असलेल्या देशांच्या अभिव्यक्तीला बळकटी आणि आत्मविश्वास लाभतो असं प्रधानमंत्री म्हणाले. दहशतवाद आणि दहशतवादाचे पाठीराखे मानवतेचे शत्रू आहेत, तसंच सध्याच्या काळातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी जागतिक संस्थांमध्ये सुधारणा होण्याची गरज आहे या मुद्यांवर दोन्ही देशांचं एकमत असल्याचंही ते म्हणाले.

प्रधानमंत्री आणि ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांमध्ये झालेल्या द्विपक्षीय बैठकीत दोन्ही नेत्यांनी परस्परांमधील द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. व्यापार, ऊर्जा, संरक्षण, कृषी, हवामान कृती, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर्स, खनिजं आणि ग्लोबल साउथ अंतर्गतच्या देशांमधलं परस्पर सहकार्य अशा विविध क्षेत्रांमध्ये भारत आणि ब्राझीलमधली धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यावर या बैठकीत चर्चा झाली असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. यावेळी भारत आणि ब्राझीलमध्ये अत्यावश्यक खनिजं, डिजिटल सहकार्य, पारंपरिक ज्ञानाची देवाणघेवाण, आरोग्य, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, उद्योजकता आणि जनसंवाद यांसह इतर क्षेत्रांशी संबंधित करारांना अंतिम रुप दिलं गेलं.

**<><><><><>**

देशात सध्या परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीची गरज असून बांधकामाची आखणी त्यानुसार करण्यात यावी, असं केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटरियर डिझायर्नसनं आयोजित केलेल्या संमेलनात बोलत होते. बांधकाम क्षेत्र हे वेगानं

प्रगती करत असून त्याद्वारे सर्वाधिक रोजगार निर्मिती होत आहे आणि केंद्र आणि राज्य सरकारलाही जीएसटीच्या माध्यमातून सर्वाधिक महसूल मिळत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

नितीन गडकरी आज एडव्हेंटज विदर्भ या कार्यक्रमातही सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी महामेट्रोच्या वतीनं क्वालिटी हेल्थकेअर या कंपनीबरोबर एका सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या उभारणीसाठीच्या स्वीकृती पत्राचं हस्तांतरण केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याने दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी आज ठाणे जिल्ह्यातल्या दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर झाले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचार सभेत राहुल गांधी यांनी संघाबाबत केलेल्या वक्तव्याबद्दल दाखल झालेल्या खटल्यात माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील जामीन होते. मात्र, गेल्या वर्षी त्यांचं निधन झाल्यामुळे नवा जामीन सादर करण्याचे निर्देश भिवंडी दंडाधिकारी न्यायालयानं दिले. त्यानुसार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जामीन म्हणून अर्ज दिला. याप्रकरणी पुढची सुनावणी ४ एप्रिलला होणार आहे. दरम्यान राहुल गांधी यांनी आज मुंबईत पक्षाच्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी महापालिका निवडणुकीतल्या पक्षाच्या कामगिरीचा तसंच राज्यात काँग्रेस पक्षाचं स्थान मजबूत करण्यासाठीच्या प्रयत्नांविषयीचा आढावा घेतला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम श्रृंखलेचा १३१ वा भाग

असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

<><><><><>

भावी पिढ्यांचा भविष्य काळ अबाधित राखण्यासाठी नैसर्गिक शेतीचा अवलंब आणि पर्यावरणाचं रक्षण करणं आवश्यक असल्याचं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी म्हटलं आहे. ते राज्याच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागानं आयोजित केलेल्या ‘माझी वसुंधरा अभियान सन्मान’ कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी त्यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी भरीव योगदान देणाऱ्या विविध स्वायत्त संस्थांना विशेष पुरस्कार प्रदान केले.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यातल्या शेगाव इथं २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला आज केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मार्गदर्शन केलं. आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचावा हाच या मेळाव्याचा उद्देश असल्याचं जाधव यांनी यावेळी सांगितलं. या मेळाव्याचा सगळ्यांनीच लाभ घ्यावा अस आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

<><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या ९ आयुष्मान आरोग्य मंदिर केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन मिळालं आहे. यात जव्हार मधली ४ केंद्र, तर तलासरीतली दोन, विक्रमगड , वसई , आणि डहाणू तालुक्यातली प्रत्येकी एक केंद्र आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके हा भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयामार्फत राबविण्यात येणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या मध्ये आरोग्य संस्थांमधील सेवा गुणवत्ता, औषध

आणि साधनसामग्री व्यवस्थापन, रुग्ण तपासणी प्रक्रिया, रुग्ण समाधान, स्वच्छता आणि सुरक्षितता आदी बाबींचं केंद्रीय समिती कडून सखोल मूल्यमापन करून मानांकन दिलं जातं. मानांकनाची प्रमाणपत्रे संबंधित केंद्रांना जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

<><><><><>

ऑस्ट्रेलियामध्ये सुरु असलेल्या महिलांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला एडलेड इथला आजचा शेवटचा सामना भारतीय महिलांनी १७ धावांनी जिंकला. यासह भारताने ही मालिका २-१ नं  जिंकली. भारतानं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात १७६ धावा केल्या होत्या. त्याच्या प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाच्या संघाला ९ गडी बाद १५९ धावाच करता आल्या. भारतीय गोलंदाज श्रीयांका पाटील आणि श्री चरानी यांनी प्रत्येकी ३ बळी मिळवले. भारतातर्फे फलंदाजीत स्मृती मंधानानं ५५ चेंडूत ८२ तर जेमिना रॉड्रिक्सनं ४६ चेंडूत ५९ धावा केल्या.

<><><><><>

पुरुषांच्या क्रिकेट टीट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आता न्यूझिलंडचा मुकाबला पाकिस्तानशी होत आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियमवर हा सामना सुरु झाला आहे.

<><><><><>

राज्यात पुढच्या दोन दिवसात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पुढचे दोन दिवस पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><>//